# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ / श्रावण ३, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) विशेष सहाय्य मंत्री**<br>**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**<br>**(४) मृद व जलसंधारण मंत्री**<br>**(५) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री**<br>**(६) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### भिवंडी (जि.ठाणे) शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

**(१) * ६८४४८ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथून भिवंडी शहरात प्रवेश करण्यासाठी ठाणे वडपे रस्ता हा एकमेव मार्ग सद्य:स्थितीत उपलब्ध असल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कसेळी रोड येथील वाढत्या नागरी वसाहती, लॉजिस्टिक पार्क व उद्योग व्यवसाय इत्यादींमुळे त्या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पडघा ते ठाणे द्रुतगती मार्गाची (Expressway) निर्मिती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून भिवंडी शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) वडपे ते ठाणे हा रस्ता वाहतुकीस वाहन क्षमतेएवढा ८ पदरी रस्त्याच्या बांधणीचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने मंजूर केला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची या रस्त्याच्या बांधकामासाठी उद्योजक म्हणून नेमणुक करण्यात आली असून ८ पदरी रुंदीकरणाच्या रस्त्याचे काम सुरु आहे.

पडघा ते ठाणे या दरम्यानचा रस्ता द्रुतगती मार्ग बनविण्याबाबत मा.श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांचे दिनांक १९ मे, २०२३ रोजीचे निवेदन दिनांक ०६ जून, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्राप्त

झाले असनू सदर निवेदन महामंडळाने दिनांक २२ जून, २०२३ च्या पत्रान्वये प्रादेशिक कार्यालय, भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण, मुंबई यांना पाठविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(२) * ६५४७३ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण, आरोग्याच्या समस्या, स्वच्छतेचा अभाव, गृहपाल व सुरक्षारक्षक पूर्णवेळ हजर नसणे, नासलेल्या फळांचे वाटप, पिण्याच्या पाण्याचा अभाव तसेच बिघडलेले संगणक संच इत्यादी बाबींची तक्रार अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी व वसतिगृहातील विद्यार्थीनींनी जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून दिनांक २५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, खामगांव व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खामगांव यांना वसतिगृहात तपासणीकरीता पाठविले असता, सदर ठिकाणी सोयी-सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त वसतिगृहातील मुलींना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) व (३) सदर वसतिगृहाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधिकारी, बुलढाणा यांनी दिलेल्या सूचनेनुसार मुख्याधिकारी, नगरपरिषद, खामगांव व गटविकास अधिकारी, पंचायत समिती खामगांव यांनी संबंधित वसतिगृहास भेट देऊन चौकशी केली असता, तक्रारीमध्ये तथ्यता आढळून आल्याने संबंधित गृहपालाचा कार्यभार अन्य गृहपालाकडे सोपविण्यात आला असून, संबंधित गृहपालाविरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(३) * ६७६९८ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत रु.६.५० कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराची दिरंगाई व बेजबाबदारपणा तसेच अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर योजना अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील कामास साडेतीन वर्षे होत असूनही अद्याप अनेक कामे प्रलंबित असल्याने या भागातील नागरीकांना बोअरवेलचे पाणी प्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत जलवाहिनी टाकण्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू योजना तात्काळ पुर्ण करुन यास जबाबदार कंत्राटदार व अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत अंजनगाव सुर्जी शहराच्या रुपये ६.६६ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.
(२) सदर प्रकल्पाचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१९ रोजी नगरपरिषदेमार्फत कार्यादेश देण्यात आलेले असून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदर प्रकल्पाचे काम रखडले होते. तदनंतर सदर प्रकल्पाचे काम जलदगतीने सुरु असून दिनांक ३० एप्रिल, २०२३ पर्यंत या प्रकल्पातील ९० टक्के कामे पुर्ण झालेली आहेत.
(३) या योजनेंतर्गत वितरण व्यवस्था टाकण्याचे कामे पूर्णत्वास आलेली असून टाकण्यात आलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे शहरात सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे. तथापि, या योजनेंतर्गत प्रस्तावित नसलेल्या शहराच्या काही नवीन भागामधील ठिकाणीच नागरिक पाण्यासाठी बोअरवेलचा वापर करीत आहेत.
(४), (५) व (६) अंजनगाव शहर पाणीपुरवठा प्रकल्पातील मंजूर योजनेनुसार वितरण व्यवस्थेची कामे करण्यात आली असून शहरास पाणीपुरवठा सुरु आहे. शहरातील वाढीव भागात परंतू मंजूर योजनेत नसलेल्या वस्तीत स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार अतिरिक्त वितरण व्यवस्थेचे काम नगरपरिषदेमार्फत करण्यात आले असून वितरण व्यवस्था जोडणीची कामे प्रगतीपथावर असून सदर भागात नियमीत पाणीपुरवठा करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

तसेच, प्रकल्पाचे काम विहित मुदतीत केले नसल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत अंजनगाव सुर्जी शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंत पूर्ण करून शहरास सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## घणसोली (नवी मुंबई) येथील सेक्टर १६ मधील अनधिकृत बांधकामाबाबत

**(४) * ६७०५६ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील घणसोली येथील सेक्टर १६ मधील भूखंड क्र. १०६ या २६८६ चौ.मी. भूखंडावर मार्केट होण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी महानगरपालिकेमध्ये ठराव मंजूर करून मार्केटचे आरक्षण टाकले असताना तेथे भुमाफियांनी दुमजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी माजी नगरसेवक, श्री.द्वारकानाथ भोईर यांनी सिडको, महानगरपालिका (अतिक्रमण विभाग), घणसोली विभाग अधिकारी, उपायुक्त परिमंडळ, मुख्य नियंत्रक, सिडको अनधिकृत बांधकाम विभाग, ठाणे जिल्हाधिकारी, आयुक्त, महानगरपालिका इत्यांदीकडे पुराव्यासह वारंवार लेखी तक्रारी करूनही या अनधिकृत बांधकामाविरोधात व भूमाफिया विरोधात कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नवी मुंबईतील घणसोली येथील सेक्टर-१६ भूखंड क्र.१०६, क्षेत्र २६८६ चौ.मी. या भूखंडावर नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक १३.१२.२०१९ रोजी ठराव मंजूर करून मार्केटचे आरक्षण टाकले आहे. तथापि, सदरचा भूखंड सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित झालेला नाही.

सदर भूखंडावर श्री.राहुल पाटील (विकासक) यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५४ अन्वये महानगरपालिकेमार्फत दिनांक १८.७.२०२२ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच सिडकोमार्फत दिनांक १५.९.२०२२ रोजी चौकशी नोटीस व दिनांक १७.१०.२०२२ रोजी उक्त अधिनियमांतर्गत नोटीस देण्यात आली आहे. तसेच, संबंधितांवर उक्त अधिनियमांतर्गत रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दिनांक ४.१०.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सदर अनधिकृत बांधकामाविरोधात दिलेल्या नोटिसी संदर्भात श्री.नरेश वसंत पाटील यांनी मा.दिवाणी न्यायालय, वाशी येथे आरसीएस क्र.३८८/२०२२ अन्वये दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ४.१०.२०२२ रोजी कारवाई करण्याचे मनाई आदेश दिले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर (पश्चिम) येथील आर सीटी मॉलमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५) * ६८६०९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील घाटकोपर (पश्चिम) येथील लाल बहादूर शास्त्री मार्ग सीटी सर्व्हे नं.१६६, १६६/१ ते २३ या २१ एकर जागेत बांधकाम केलेल्या आर सीटी मॉलचे बांधकाम मंजूर आराखड्याप्रमाणे न करता, अतिरिक्त चटई क्षेत्राचा बेकायदा वापर करुन सुमारे ८० हजार चौ.फू. अनाधिकृत बांधकाम करुन त्याची विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) तसेच सदर बांधकामात सन २००९ ते २०१६ या कालावधीतील सात वर्षाचा मालमत्ता कर बुडवून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त २१ एकर जागेत बांधकाम केलेल्या आर सीटी मॉलच्या संपूर्ण बांधकामासंदर्भात अद्यापही मोजणी व मुल्यांकन केले नसल्याबाबत तक्रारदार, श्री.मयुर शाह यांनी दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामाबाबत तसेच महापालिकेचे इमारत-प्रस्ताव, अभियंता आणि सहाय्यक महापालिका आयुक्तांसह संबंधित अधिकारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) घाटकोपर (पश्चिम) येथील आर सिटी मॉलला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २०.०२.२००९, ०२.०७.२००९, ०५.११.२०११, ०७.०२.२०१३, २८.०९.२०१७ व दिनांक २१.०७.२०२२ रोजी टप्प्याटप्प्याने भाग भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर मॉलच्या विकासकाने दिनांक १९.०९.२०२२ रोजी सादर केलेल्या सुधारीत नकाशांना दिनांक ०१.०६.२०२३ रोजी मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार सदर मॉलच्या इमारतीतील २५४.२१ चौ.मी. क्षेत्रफळाचे अनधिकृत बांधकाम नियमित करण्यात आले असून, ५६०१.८५ चौ.मी. क्षेत्रफळाचे अंतर्गत फेरबदल नियमित करण्यात आले व ७९७२.७३ चौ.मी. क्षेत्रफळाचे नवीन चटईक्षेत्र मंजूर करण्यात आले आहे. अंतर्गत फेरबदल व बांधकाम नियमित करण्याकरिता रुपये ७९.२० लाख इतकी रक्कम नियमितीकरण शुल्क म्हणून विकासकाकडून वसुल करण्यात आली आहे.

(२) आर सिटी मॉलची मालमत्ता एनएक्स १००९२७१४४००००, एनएक्स १००९२७३२२०००० व एनएक्स १००९२७३७३०००० अशी तीन मालमत्ता लेखा क्रमांकात विभागली आहे. त्यापैकी,

एनएक्स १००९२७१४४०००० या मालमत्तेस दिनांक ०२.०७.२००९ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, त्याचा प्रत्यक्ष वापर दिनांक १८.०९.२००९ पासून सुरु झाल्यामुळे सदर मालमत्ता त्या तारखेपासून करनिर्धारित करण्यात आली आहे.

एनएक्स १००९२७३२२०००० या मालमत्तेस दिनांक ०५.११.२०११ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून त्या तारखेपासून ती करनिर्धारित करण्यात आली आहे. सन २००९ ते २०१६ या कालावधीतील रुपये ६८.४८ कोटी इतक्या रकमेचा सदर मालमत्तेच्या मालमत्ता कराचा भरणा पक्षकाराने केलेला आहे.

एनएक्स १००९२७३७३०००० या मालमत्तेस दिनांक २८.०९.२०१७ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, त्या तारखेपासून सदर मालमत्ता करनिर्धारित करण्यात आली आहे.

(३) व (४) सदर २१ एकर जागेत आर सिटी मॉल व्यतिरिक्त दि ऑर्चिड रेसिडन्सी को.ऑप.हौ. सोसायटी लि. च्या एकूण १२ मालमत्ता लेखा क्रमांकात विभागल्या असून त्या सन २०१०-११ पासून करनिर्धारित आहेत. सदर सोसायटीमार्फत मालमत्ता कराचा नियमित भरणा करण्यात येत आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वाहनतळ स्वतंत्र मालमत्ता लेखा क्रमांकाने दिनांक ०१.०४.२०१५ पासून करनिर्धारित आहे.

आर सिटी मॉलची पुनर्मोजणी दिनांक १२.०९.२०२२ ते दिनांक २६.०९.२०२२ या कालावधीत अधिक्षक सर्वेक्षण यांचेमार्फत करण्यात आली असून, त्यांचेकडून प्राप्त मोजणी अहवालानुसार मुल्यांकन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कात्रज व जांभूळवाडी तलावातील जलपर्णी काढण्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(६) * ६६२७७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कात्रज व जांभूळवाडी तलावातील जलपर्णी काढण्याच्या कामामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील नदी, तलावांमधील जलपर्णी काढण्यासाठी कोट्यवधी रुपये निधी खर्च झाला असतांना किती जलपर्णी काढण्यात आली याची माहिती मलनिःसारण विभागाचे अधीक्षक अभियंता यांनी नोटीसा बजावून देखील महापालिका आयुक्तांना दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निविदा मुदत कालावधी संपला असतांना ४०% काम अद्यापही प्रलंबित असून जलपर्णी आणि तलावात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मलनि:सारण विभागाचे अधिक्षक अभियंता यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना त्यांनी विचारलेली माहिती दिलेली आहे. शहरातील पाषाण, कात्रज, राजीव गांधी संग्रहालय, जांभूळवाडी व नदी असे सर्व मिळून ५१७७८५.०० चौ.मी. इतकी जलपर्णी काढण्यात आलेली आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

जांभूळवाडी तलावामधील जलपर्णी मार्च, २०२३ मध्ये पुर्णपणे काढण्यात आलेली आहे. तसेच कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रालयामधील तलावातील जलपर्णी काढण्याचे काम दिनांक ३१.०५.२०२३ पर्यंत पूर्ण करण्यात आले असून कात्रज तलाव जलपर्णी मुक्त करण्यात आले आहे.

कात्रज तलावात कात्रज वसाहतीकडून येणाऱ्या सांडपाण्यासाठी ६०० मी.मी. व्यासाची ९१० र.मी. लांबीची मलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे कात्रज तलावात कात्रज वसाहतीकडून येणाऱ्या नाल्यातील सांडपाणी पूर्णत: बंद झालेले आहे.

तसेच १५ वा वित्त आयोगाअंतर्गत राजिव गांधी प्राणी संग्रहालयातील नाल्यातून येणारे मैलापाणी शुध्द करण्याकरीता २ एमएलडी क्षमतेचा मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे. सदरचे काम सद्यस्थितीत सुरू असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे वसाहत व जंगल परिसरातील समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(७) * ६५६५५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीमधील परिसरात पाणी टंचाई, खराब रस्ते, अनधिकृत बांधकामे, छुप्या मार्गाने डेब्रिज टाकणे, नाले सफाईची अपूर्ण कामे तसेच अनधिकृत फेरीवाल्यांचा उपद्रव या समस्यांमुळे स्थानिक नागरिक आणि पर्यावरण प्रेमींमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याने आरेसारख्या इको सेन्सिटिव्ह परिसराचे पर्यावरण धोक्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जंगल परिसरातील झाडाझुडपांवर कचरा टाकल्याने सदर कचरा तलावात जाऊन तसेच मुर्ती देखील याच तलावात विसर्जित केल्यामुळे पाणी प्रदूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी "कचरा टाकणे त्वरित थांबवा आणि जंगलाचे संरक्षण करा" त्याचबरोबर ज्यांनी कचरा फेकण्याची परवानगी दिली आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी वनशक्ति संस्थेने दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने आरे वसाहत व जंगलातील समस्यांचे निराकरण करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

गोरेगांव (पूर्व) येथील आरे वसाहत हा भूभाग मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे दुग्धवसाहत) यांच्या अखत्यारीत येतो व येथील सोयी-सुविधा मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे दुग्धवसाहत) यांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" सापेक्ष देण्यात येतात.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने अनुसूचित जाती, नवबौध्द तसेच दुर्बल घटकांसाठी सुरु करण्यात आलेल्या रमाई आवास योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याबाबत

**(८) * ६९४७० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने अनुसूचित जाती आणि नवबौध्द तसेच दुर्बल घटकांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी रमाई आवास योजना सुरु केली असून त्यासाठी शासनाकडून मिळणारा रुपये २४ कोटीचा निधी प्रलंबित असल्यामुळे लाभार्थी या योजनेपासून वंचित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णयातील काही जाचक अटींमुळे योजनेचा लाभ गोरगरीब जनतेला मिळत नसून बांधकामाकरीता लागणाऱ्या साहित्यांच्या किंमती वाढल्यामुळे तरतूद असलेल्या अनुदानामध्ये घरकुलांचे बांधकाम पूर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेचा लाभ मिळण्यासाठी खाजगी जमिनीवरील घोषित व अघोषित झोपडपट्ट्यांमध्ये रमाई घरकुल योजना आवास राबविण्याचा निर्णय घेण्याबाबत व सदर घरकुल योजनेच्या अनुदानाची मर्यादा रुपये ७ लाखापर्यंत वाढविण्याबाबत सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन योजनेचा प्रलंबित निधी त्वरीत वितरीत करणे, खाजगी जमिनीवरील घोषित व अघोषित झोपडपट्ट्यांमध्ये सदर योजनेचा लाभ देणे आणि योजनेची मर्यादा रुपये ७ लाखापर्यंत वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विभागाच्या दिनांक ७.१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रमाई आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागातील सर्वसाधारण क्षेत्रासाठी रूपये १.३२ लक्ष व डोंगराळ व नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी रूपये १.४२ लक्ष (रूपये १२०००/- शौचालय बांधकामासह) तसेच शहरी भागासाठी रूपये २.५० लक्ष इतके अनुदान मर्यादा

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व शहरी) या योजनेच्या धर्तीवर निश्चित करण्यात आलेली आहे. राज्याची रमाई आवास योजना ही केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येते. सबब, पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल बांधकाम निधीत वाढ झाल्यास त्याप्रमाणे रमाई आवास योजनेमध्ये शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सततचा अवकाळी पाऊस, गारपीट व नापिकीमुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत**

**(९) * ६४८०८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सततचा अवकाळी पाऊस, गारपीट व नापीकीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मागील तीन वर्षामध्ये विशेषत: अमरावतीमध्ये ३३६९, नागपूरमध्ये ९५३ व मराठवाड्यात १३२७ शेतकऱ्यांनी सततची नापिकी व कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कमी शेती, शाश्वत सिंचनाचा अभाव, लहरी निसर्ग, गुंतवणूक व श्रमाच्या तुलनेत शेतातून उत्पन्न मिळत नसणे, शेतीमालाला योग्य भाव नसणे, कर्जबाजारीपणा इ. अनेक कारणांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी खरीप, रब्बी मोसमात एकरी १० हजार रुपये अनुदान देण्याबाबतची मागणी विविध स्तरावरुन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
राज्यात मागील ३ वर्षामध्ये म्हणजेच १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत विशेषत: अमरावती विभागात ३४५२, नागपूर विभागात ९५७ व मराठवाडा विभागात २६८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. सदर आत्महत्या प्रकरणांची चौकशी केली असता, सततची नापिकी, कर्जबाजारीपणा तसेच कर्जफेडीचा तगादा या कारणांमुळे अमरावतीमध्ये १४०४ नागपूरमध्ये ३१७ व मराठवाड्यामध्ये २११० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून आले आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी मदत व पुनर्वसन विभागाकडे दिनांक ३०.६.२०२३ रोजी पाठविलेल्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालात राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी काही योजना बंद करून खरीप, रब्बी मोसमात एकरी १० हजार रूपये अनुदान देण्याबाबत शिफारस केली आहे.

(५) तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य देण्याबाबत रूपये १०,००० एकरी (तेलंगणाचे UBT च्या धर्तीवर) प्रस्तावास मान्यता देणे शक्य नाही. केंद्राच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना रूपये ६००० प्रतिवर्ष इतकी रक्कम देण्यात येते. या व्यतिरिक्त राज्य शासनाकडून नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजनेतंर्गत रू.६००० इतकी रक्कम प्रतिवर्ष शेतकऱ्यांना देण्यासाठी रूपये ६०६० कोटींची तरतूद राज्य शासनाकडून करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात अस्वच्छतेचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(१०) * ६७५३८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर्वाधिक रुग्णसंख्या असलेल्या सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालय व परिसरात अस्वच्छतेचे वातावरण असून त्याचा त्रास रुग्ण, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे मध्यवर्ती खरेदी खात्याकडून (CPD) ठेकेदार कंपनी नियुक्त करण्यात आली असून कंत्राटदाराकडून अपुऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती, उपलब्ध कर्मचारी काम करीत नसणे तसेच स्वच्छतेसाठी आवश्यक ती साधनसामुग्री देखील कंत्राटदाराकडून पुरविण्यात न आल्यामुळे संपूर्ण रुग्णालयात अस्वच्छतेमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रुग्णालयाच्या दैनंदिन स्वच्छतेसंदर्भात तसेच संबंधित दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात सफाई कर्मचाऱ्यांची ५१५ पदे अनुसूचीवर असून, त्यापैकी १७५ पदे रिक्त आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्रमुख रुग्णालयात स्वच्छता राखण्यासाठी निविदा काढून ठेकेदारांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार लोकमान्य टिळक रुग्णालयात सदर कामाकरिता ब्रिस्क इंडिया प्रा.लि. या संस्थेची दिनांक १३.१२.२०२२ ते दिनांक १२.१२.२०२५ या कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि सुरुवातीपासूनच सदर संस्थेने पुरेशा प्रमाणात कर्मचारीवर्ग व त्यांना स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात आवश्यक असणारी साधनसामग्री पुरविली नाही. त्यामुळे सदर ठिकाणी अस्वच्छता होत होती हे खरे आहे. तथापि अस्वच्छतेमुळे होणारी गैरसोय टाळण्याकरिता कार्यरत कर्मचाऱ्यांकडून साफसफाई करुन घेण्यात येते.
(३) लोकमान्य टिळक रुग्णालयातील दैनंदिन स्वच्छतेची पाहणी करण्याकरिता वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक कार्यरत असून, त्यांचेमार्फत रुग्णालयीन कर्मचाऱ्यांची मदत घेऊन साफसफाईचे काम करण्यात येते.

तसेच अपुरी कर्मचारी संख्या, स्वच्छतेसाठी आवश्यक असणारी साधनसामग्री न पुरविणे या कारणांसाठी वेळोवेळी सदर संस्थेच्या पर्यवेक्षकास प्रत्यक्ष समज देण्यात आली असून, त्यानंतरही पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध न केल्याने व कामात सुधारणा न आढळल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर संस्थेस रुपये ११.९३ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे. यानंतरही कामाचा दर्जा व कर्मचाऱ्यांची संख्या यामध्ये सुधारणा न झाल्यास निविदेतील अटी व शर्तींनुसार सदर संस्थेविरुध्द नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील दोनशे शेतकऱ्यांची टोमॅटो खरेदी प्रकरणात झालेली फसवणूक

**(११) * ६८९९२ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील दोनशे उत्पादक शेतकऱ्यांकडून हजारो टन टोमॅटो खरेदी करुन २ कोटी २९ लाख रुपयांची रक्कम न देता संबंधित व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची फसवणुक केली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबधित व्यापाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना त्यांची रक्कम मिळवून देणे तसेच संबंधित फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक चे सन २०२२-२०२३ मधील परवानाधारक आडतदार इन्कलाब व्हेजीटेबल कंपनी प्रो. प्रा. श्री. नौशाद मकसुद फारुकी यांनी १९८ शेतकऱ्यांच्या टोमॅटो शेतमालाची खरेदी करून रुपये २,१५,२१,७०४/- इतकी रक्कम न देता बेपत्ता झाल्यामुळे फसवणूक केलेली आहे.त्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक यांनी पंचवटी पोलिस स्टेशन येथे दिनांक ०७.०४. २०२३ रोजी फिर्याद क्रमांक १६८/२०२३ दाखल केलेली आहे. आडतदार श्री.नौशाद मकसुद फारुकी यांचेकडे रुपये २,१५,२१,७०४/- रक्कमेसह,बाजार फी रुपये ३,९०,७१३/- व शासनाची सुपरव्हीजन फी रुपये १९,५३५/- असे एकूण रक्कम रुपये २,१९,३१,३९२/- थकबाकी आहे.
(३) नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीने सदर आडतदाराने समितीस तारण दिलेले गाळे बाजार समितीने जप्त केलेले असून सदर गाळे विक्रीबाबत कार्यवाही चालू आहे.तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०२.०६.२०२३ रोजीचे आदेशान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५७ (२) नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (आऊयो), दिंडोरी यांचे न्यायाधिकरण नेमलेले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच पंचवटी पोलीस ठाणे येथे सदर आडतदारावर गुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्याबाबत आर्थिक गुन्हे शाखेमार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनमाड (जि.नाशिक) बस आगाराच्या यात्रा स्पेशल बसला झालेला अपघात

**(१२) * ६४५८० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सप्तशृंगी गडावरून निघालेल्या मनमाड आगाराच्या बस क्र.एमएच १४ बीटी ०१०९ ला चांदवडकडे जाताना मतवाडी फाटा येथिल गांगुर्डे वस्ती येथे दिनांक ७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास भीषण अपघात झाल्याने महिला कंडक्टरसह २ जणांचा मृत्यू व १७ प्रवासी गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपघात होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू अपघाताची चौकशी करुन शासनाने मृत व जखमी प्रवाश्यांच्या नातेवाईकांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) व (३) रा.प.महामंडळाच्या बस चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने रा.प.बस एका झाडाला घासून पुढील दुसऱ्या झाडावर जोरात आदळल्याने प्राणांतिक स्वरुपाचा अपघात झाल्यानंतर बस चालक श्री.संतोष सदाशिव भालेराव बिल्ला क्र.७५ रा.प.मनमाड आगार हे अपघातास जबाबदार आढळुन आले आहेत. या अपघातात चालक देखील जखमी झाल्याने दिनांक १२.०४.२०२३ पर्यंत वैद्यकीय उपचारार्थ दवाखान्यात दाखल होते. तसेच ते अद्यापपावेतो वैद्यकीय रजेवर असल्याने कामगिरीवर हजर झालेले नाहीत. रा.प.नाशिक विभागाकडून त्यांना खातेनिहाय प्रमादिय कारवाई अंतर्गत आरोपपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अपघातातील मृत महिला वाहकाचे वारसांना व जखमी प्रवाशांना आजपावेतो रा.प.महामंडळाकडून रुपये २२,४७,७२५ /- इतकी अपघात नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात आली आहे. ०१ मृत महिला प्रवाशी यांचे वारसांना व जखमी व्यक्ती यांना अपघात नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर नगरपरिषदेच्या निधीतून आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ६६६४८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेच्या निधीतून ९ कोटी ६० लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, जंतुनाशकांची खरेदी आणि फवारणीच्या कामासाठी बेकायदा, नियमबाह्य व सदोष निविदा प्रक्रिया राबविणे, जादा दराने निविदा मंजूर करणे, मुदतबाह्य व निकृष्ट जंतुनाशके, कीटकनाशके खरेदी करणे इ. कामांमध्ये गत अनेक वर्षापासून गैरव्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, नगरपरिषदेच्या कंत्राटदारांकडे नगरपालिका, महापालिका क्षेत्रात जंतुनाशके व कीटकनाशकांचा पुरवठा अथवा फवारणीचा अनुभव नसल्याची बाब देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) जंतुनाशके / किटकनाशके खरेदी करणे व औषध फवारणी करणे या कामांची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात

आली आहे. प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या दरापेक्षा L-१ निविदाधारक यांचे दर कमी असून सदर निविदाधारक यांनी भरलेल्या कमी दरामध्ये वाटाघाटी करुन ठरलेल्या दरास सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे. खरेदी करण्यात आलेली जंतुनाशके / किटकनाशके वापरण्याची मुदत कालावधीत असून शासनमान्य प्रयोगशाळेमध्ये त्यांची तपासणी करुन वापरण्यात आली आहेत. प्राप्त औषधे वेळोवेळी वापरण्यात आली असून त्यांचा नागरिकांना उपयोग झालेला आहे.

(३) व (४) नगरपरिषदेच्या कंत्राटदाराकडे जंतुनाशक / किटकनाशक पुरवठा व फवारणी करणे या कामाचा पूर्वानुभव आहे. यासंदर्भात स्थानिक निधी लेखा परिक्षक यांचेकडून लेखापरीक्षण करुन घेण्यात आले असून त्यामध्ये कोणतेही आक्षेप उपस्थित करण्यात आले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेने शासनाची पूर्वपरवानगी न घेता भूसंपादनाचे देयक अदा केल्याबाबत

**(१४) * ६४८६९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेने अर्थसंकल्पात तरतूद नसतांना महानगरपालिकेच्या राखीव निधीमधून शासनाची पूर्वपरवानगी न घेता भूसंपादनाचे ४५० कोटी रुपयांचे देयक अदा केल्याचे दिनांक २६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महानगरपालिकेने अर्थसंकल्पामध्ये ३३३ कोटींचे दायीत्व लपवून गैरव्यवहार केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे दिनांक २६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मनपा स्वनिधीमधून देयके अदा करतांना शासनाची परवानगी घेण्याची अधिनियमात तरतूद नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) अन्वये महासभेची प्रशासकीय व स्थायी समितीची वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर आयुक्तांच्या मान्यतेने देयकांची अदायगी केलेली आहे हे खरे आहे.

(२) लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागणी केली हे खरे आहे तथापि, लोकप्रतिनिधी यांच्या उक्त पत्रातील आक्षेप हे सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील रस्ते बांधणे व पूल व सांडवे बांधणे याबाबत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका पी/उत्तर विभागांतर्गत येणाऱ्या भूखंडावर भूमाफियांनी केलेले अनधिकृत बांधकाम

**(१५) * ६९९६० श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका पी/उत्तर विभागाअंतर्गत असणारे मौजे मालवणी, एरंगल, भाटी, आक्सा, मनोरी, मढ, राठोडी येथील शासनाच्या व खासगी मालकाच्या भूखंडावर भूमाफियांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने

अनधिकृत बांधकाम केले असल्याची बाब दिनांक १५ मे २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात यावे याकरिता लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री सचिवालय, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व संबंधित विभाग यांना निवेदन दिलेले असूनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त पत्रात नमूद केलेल्या अनधिकृत बांधकामांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली / येत आहे:-

मालाड (प.) येथील मार्वे रोड, बाजार गल्ली, पाठारे वाडी, भोले कॉटेज येथील अनधिकृत बांधकामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ (ए) अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, सदर प्रकरण दिंडोशी येथील मा.सत्र न्यायालयात दावा क्र. बीसीसीसी सूट क्रमांक (एसटी) ६५४९/२०२३ अन्वये न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

मालाड (प.) येथील मार्वे रोड, राठोडी व्हिलेज, फिल्ड लॅण्ड बंगल्याजवळील अनधिकृत बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ (ए) अन्वये नोटीस बजावून दिनांक ०७.०६.२०२३ व दिनांक ०६.०७.२०२३ रोजी सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. तसेच दिनांक ०७.०७.२०२३ रोजी संबंधित बांधकाम धारकाविरोधात मालवणी पोलीस ठाणे येथे मुंबई प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२(४३) अन्वये तक्रार नोंदविण्यात आलेली आहे.

मालाड (प.) येथील मढ जेट्टी रोड येथील चंदा गौरी हाऊसच्या बाजूला असणाऱ्या अनधिकृत बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, सदर प्रकरण दिंडोशी येथील मा.सत्र न्यायालयात दावा क्र. ६८८/२०२३ अन्वये न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

तक्रारीत नमूद केलेल्या इतर दोन अनधिकृत बांधकामांचा पत्ता हा मोघम स्वरुपाचा असल्यामुळे तक्रारदारास संयुक्त स्थळ पाहणीसाठी दिनांक ०४.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर स्थळ पाहणीनंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहरातील सिमेंट कारखान्यांतून निघणाऱ्या धुळीमुळे होत असलेले प्रदूषण

**(१६) * ६८४९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहराच्या सभोवताली चार मोठ-मोठे सिमेंट कारखाने असून, कारखान्यातून निघणाऱ्या धुळीमुळे व जड वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषणात वाढ होऊन येथील नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील प्रदूषणामुळे नागरीकांना दमा, अस्थमा, खोकला तसेच पोटाचे विकार यासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
गडचांदूर येथे धुलीकणांच्या प्रदूषणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
जिल्हा आरोग्य अधिकारी, यांच्या दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या रूग्णांच दमा, ब्रांकायटिस, पोटाचे विकार आजाराचे प्रमाण अत्यल्प असून सदर आजारावर रूग्णांना औषधोपचार करण्यात आलेला आहे.
(३) कोरपना तालुक्यातील सर्व सिमेंट उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते. तसेच पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगांवर नियमित योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
कोरपना तालुक्यातील सिमेंट उद्योगावर खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :-

१. मे.अल्ट्राटेक सिमेंट युनिट माणिकगड सिमेंट, गडचांदूर, ता.कोरपना, जि.चंद्रपूर या उद्योगाची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मान्यतेनूसार दिनांक १०/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५०.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.
२. मे.अंबुजा सिमेंट, मौजा उप्परवाही, ता. कोरपना, जि.चंद्रपूर या उद्योगाची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०३/०२/२०२२ रोजी प्रदान केलेल्या संमतीपत्रानूसार सदर उद्योगाची रुपये १०.०० लक्षची बँक हमी दिनांक १८/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आलेली आहे.
३. मे.अल्ट्राटेक सिमेंट, आवारपूर सिमेंट वर्क्स, ता.कोरपना, जि.चंद्रपूर या उद्योगाची रूपये ५.०० लक्षची बँक हमी वातावरणी हवा गुणवत्ता पृथ:करण अहवाल विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यामुळे दिनांक ०५/०७/२०२१ रोजीच्या संमतीपत्रातील अटीनूसार जप्त करण्यात आली आहे.
४. मे.दालमिया सिमेंट (भारत) लि. (पूर्वीचे नांव-मे. मुरली इंडस्ट्रीज लि.), पो. नारंडा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर या उद्योगाची रूपये ५.०० लक्षची बँक हमी वातावरणी हवा गुणवत्ता पृथ:करण अहवाल विहीत मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यामुळे दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या संमतीपत्रातील वायु प्रदुषणासंबंधीत अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे जप्त करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील सर्व सिमेंट उद्योगांनी आवश्यक ती हवा व जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारलेल्या असून त्या कार्यान्वित असतात. हवा प्रदूषण रोखण्यासाठी / कमी करण्यासाठी ई.एस.पी. व योग्य उंचीचे धुरांडे या हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत तसेच त्यांच्या धुरांड्यातून बाहेर पडणाऱ्या हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी सर्व धुरांड्यांना Online Continuous Emission Monitoring System (OCEMS) यंत्रणा बसविल्या असून त्या कार्यरत असतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-निजामपूर महानगरपालिका (जि.ठाणे) शहर भुयारी गटार योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१७)** * **६९०८२ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका येथे भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचे मलनि:सारणाचे काम योग्य व नियोजनबध्द पध्दतीने करता यावे म्हणून कन्सल्टंट व शासनाकडून देखरेख म्हणून ५ संस्थांची नेमणूक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना जवळजवळ रुपये ४६२ कोटीच्या ६ एचटीपी व १० पंपिंग स्टेशन व रस्ते दुरुस्ती या कामांमध्ये संस्था, ईगल कन्स्ट्रक्शन ही कंत्राटदार कंपनी तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या कामामध्ये अनियमितता व निकृष्ट दर्जा आढळून आला असून या अंतर्गत केलेले रस्ते नादुरुस्त होऊन सुमारे २००० नागरिकांचे अपघात झाले असून त्यामध्ये अनेक जण मृत्यूमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी ठेकेदार व महानगरपालिकेचे अधिकारी जबाबदार असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेला असल्यामुळे याबाबतची चौकशी होण्याकरीता दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी शासनाने मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ करिता तांत्रिक सल्लागार (पीएमसी) म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक केलेली आहे.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ प्रकल्पाची मंजूर किंमत रुपये ४२७.९८ कोटी असून सदर योजनेमध्ये ४ मलप्रक्रिया केंद्र (एसटीपी), ७ पंपिंग स्टेशन व १५९ किमी मलवाहिनी अंथरणे व खोदाईमुळे नादुरुस्त झालेले रस्ते पूर्ववत करणे ही मुख्य उपांगे निविदेमध्ये समाविष्ट आहेत.

भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत सुरु असलेल्या कामांचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे असून त्यांच्यामार्फत सदर प्रकल्पाचे झालेल्या कामाचे मोजमाप व गुणवत्ता तपासली जाते. तसेच, सदर कामाचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्यामार्फत वेळोवेळी त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करून काम समाधानकारक असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित ठेकेदारास देयके प्रदान केलेली आहेत.

(३) सदर योजनेच्या कामांतर्गत मलवाहिन्या अंथरणेकरिता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली असून योजनेमधील दुरुस्ती केलेल्या रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अपघात वा जीवितहानी झाली असल्याची तक्रार भिवंडी निजामपूर महानगरपालिकेस प्राप्त नाही.

(४), (५) व (६) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर भिवंडी निजामपूर शहर भुयारी गटार प्रकल्प टप्पा-२ प्रकल्पाचे काम गुणवत्तापूर्ण झाले असल्याचे आयआयटी, मुंबई व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण अहवालानुसार निदर्शनास येते.

सदर प्रकल्पाच्या कामाच्या दर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासनास निवेदन प्राप्त झालेले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर विषयाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार शासनस्तरावरील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील स्मार्ट सिटी अंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१८)** * **६७२६९ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात २४ तास देखरेख ठेवण्यासाठी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून २५५ कोटी रुपये खर्च करून इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील बहुतांश ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित नसल्याने कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच स्मार्ट ट्रॅफिक अंतर्गत पोलीस आयुक्तांच्या सूचनेचा अंतर्भाव करून शहरात ६५१ ठिकाणी बसविण्यात आलेले ट्रॅफिक कॅमेरे ए.एन.पी.आर. आणि आर.एल.व्ही.डी.चा डाटा निगडी येथील आयसीसीसी सेंटरमध्ये उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयसीसीसी केंद्राच्या अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदारांशी संगनमत करुन यामध्ये गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयसीसीसी यंत्रणा प्रभावीपणे राबविणेबाबत तसेच संबंधित दोषी ठेकेदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी योजने-अंतर्गत बसविण्यात येणाऱ्या एकूण ३३०३ (City Surveillance + Smart Traffic) कॅमऱ्यांपैकी सद्य:स्थितीत २४०३ कॅमेरे बसविण्यात आले असून उर्वरित ९०० कॅमेरे बसवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. कामातील विलंबाबाबत संबंधित ठेकेदार संस्था मे.टेक महिंद्रा यांचेवर वेळोवेळी दंडात्मक कार्यवाही करणेत येत आहे.

(३) हे खरे नाही.

पिंपरी - चिंचवड स्मार्ट सिटी लि. मार्फत स्मार्ट ट्रॅफिक अंतर्गत १२१० कॅमेरे १२२ ठिकाणी बसविणे अपेक्षित आहे. यापैकी ३२९ कॅमेऱ्यांची ICCC सेंटरमध्ये जोडणी पूर्ण झालेली आहे. यापैकी ६० कॅमेरे ICCC सेंटर मध्ये दिसत असून सदर कॅमेरांच्या चित्रिकरणाचे संचयन (Video Recording Backup) ३० दिवसापर्यंत केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गटारांवर महानगरपालिकेमार्फत स्मार्ट मॅनहोल्स संकल्पना राबविण्याबाबत

**(१९) * ६८७६४ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण व पर्जन्य जलवाहिनी विभागाकडून मुंबईतील ९० टक्क्यांहून अधिक मॅनहोल्सवर संरक्षक जाळया बसविण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयाच्या दिवसात मॅनहोल्सवर संरक्षक जाळया न बसविल्यास अपघात होण्याचे प्रमाण जास्त असतानाही मुंबईत एक लाखाहून अधिक मॅनहोल्स असून केवळ ५ हजार मॅनहोल्सवर संरक्षक जाळया बसविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत मागील पाच वर्षात सुमारे ३०० हून अधिक नागरिकांचा मॅनहोल्समध्ये पडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले असून, सदरील मॅनहोल्सवरील झाकण चोरीला जाण्याचे प्रमाणही खूप वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे डिसेंबर, २०२२ मध्ये महापालिकेकडून १२ तासांत मॅनहोलची दुरुस्ती करुन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ३० कोटी रुपयांची निविदा मागविली असून, सन २०२३-२४ मध्ये पात्र कंत्राटदारास कंत्राट देणार होते, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, याअनुषंगाने महानगरपालिकेकडून स्मार्ट मॅनहोल्स संकल्पना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्मार्ट मॅनहोल्स संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण वाहिन्यांवर ७४,६८२ इतक्या प्रवेशिका (मॅनहोल्स) आहेत. तसेच मुंबई शहर विभागातील पर्जन्य जलवाहिन्यांवर २५,५९३ इतके मॅनहोल्स आहेत.

त्यापैकी मॅनहोल्स उघडण्याची शक्यता आहे अशा मलनि:सारण वाहिन्यांच्या १९०८ व पर्जन्य जलवाहिन्यांच्या ३६९२ इतक्या मॅनहोल्सवर संरक्षक जाळया बसविण्यात आल्या आहेत.

(३) मागील पाच वर्षांत मॅनहोल्समध्ये पडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच, मागील चार वर्षांत २५३१ मॅनहोल्स कव्हर्स चोरी / गहाळ झाले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापि मॅनहोल्स कव्हर्स चोरी / गहाळ झाल्याची माहिती प्राप्त होताच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत १२ तासांच्या आत नवीन मॅनहोल्स कव्हर्स बसविण्यात येतात.

(४) याबाबतची कोणतीही निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेली नाही.

(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण विभागामार्फत स्मार्ट मॅनहोल्स संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर शहर विभागातील १४ मॅनहोल्स स्मार्ट मॅनहोल्स करण्याकरिता निविदा मागवून कार्यादेश देण्यात आला आहे.

-----------------

## उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील निडेबन कार्यालयाच्या हद्दीत जमिनी खरेदी-विक्रीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) * ७००९६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील निडेबन कार्यालयाच्या हद्दीतील सर्व्हे क्र.१००/ व १००/२ या भूखंडामध्ये ओपन स्पेस न सोडता प्लॉट टाकून त्याची विक्री करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच उदगीर शहर व परिसरातील वाढीव भूखंडाच्या दरामुळे भूमाफियांनी शहरालगतच्या जमिनी खरेदी करुन त्याचे अनधिकृतरित्या प्लॉटींग टाकून विक्री केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्लॉटची विक्री केल्यानंतर रजिस्ट्री कार्यालयात नोंद करीत असतांना बनावट कागदपत्रे जोडून दस्तनोंदणी केल्याच्या तक्रारी संबंधित पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संबंधात तहसीलदार, उदगीर यांनी दिनांक ३० मे, २०२३ रोजी लातूर येथील सहाय्यक संचालक, नगररचना यांना चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी बनावट फेरफार सादर केल्याचे दिसून आल्याने तहसीलदार, उदगीर यांनी दिनांक १६.०६.२०२३ रोजी तलाठी सज्जा निडेबन मार्फत पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण, ता.उदगीर येथे फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) तहसीलदार उदगीर यांनी दिनांक ३०.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांनी खोटा बोगस फेरफार दाखल करुन रेखांकन मंजूर करुन घेतले असल्याबाबत चौकशी करण्याबाबत नगररचना शाखा कार्यालय, लातूर यांना कळविले होते. त्यानुषंगाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्रमांक २.१५ मधील तरतूदीनुसार संबंधित जमीन मालक यांना बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर पुढील निर्णय घेता येईल असे तहसीलदार उदगीर यांना त्यांचेकडून कळविण्यात आले. तदनुषंगाने तहसीलदार, उदगीर यांचेकडे दिनांक १६.०६.२०२३ रोजी संयुक्त सुनावणी घेण्यात आलेली असुन सदर सुनावणीमध्ये संचिकेची पाहणी केली असता अर्जदार यांनी खोटे बनावट फेरफार दाखल केल्याचे दिसून आले. त्यानुसार जमीन मालक यांचेविरूध्द उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत भादंवि कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोहम्मद अली रोड येथील "इबे कॅसल" या हेरीटेज इमारतीवर अतिरिक्त अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२१)** * **६७४५९ श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील "बी-वॉर्ड" अखत्यारीतील मोहम्मद अली रोड / बीबीजान स्ट्रीट येथील "इबे कॅसल" ही इमारत हेरीटेज इमारत म्हणून घोषित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत हेरीटेज वास्तू असतानाही सदर इमारतीवर अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लाईफ इन लाईट या एन.जी.ओ. ने माहे जानेवारी, २०२१ ते जून, २०२३ या कालावधीत वारंवार महानगरपालिकेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम व जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांनुसार सदर इमारत तळमजला + मेझनाईन + ६ मजले अशी नमूद आहे.
(३) हे खरे आहे.
लाईफ इन लाईट या संस्थेकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी करण्यात आली असता, सदर इमारतीत कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम चालू असल्याचे किंवा नजीकच्या काळात झाल्याचे आढळून आले नाही व याबाबत लाईफ इन लाईट या संस्थेस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील बी.डी.डी. चाळीतील सहा वर्ग खोल्या परस्पर खाजगी व्यक्तींना विकल्याबाबत

**(२२) * ६४८३६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या शाळासाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या वरळी बी.डी.डी. चाळीतील सहा वर्ग खोल्या वरळी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तथा तत्कालीन संचालक, उपविभागीय अभियंता तथा तत्कालीन व्यवस्थापक आणि तत्कालीन चाळ अधीक्षक ह्या तीन अधिकाऱ्यांनी बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे सहा व्यक्तींना बेकायदेशीर हस्तांतरित केल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निर्गमित केलेल्या पत्रातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मुंबई महानगरपालिकेच्या 'जी' दक्षिण विभागातील शालेय विभागाच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती वर्षा गांगुर्डे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांसह खाजगी व्यक्ती विरोधात वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविल्याचे दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) वरळी बी.डी.डी. चाळ क्र. ८४ व १०० मधील खोल्या शासनाची पूर्व परवानगी न घेता व खोटे पुरावे सादर

करुन खाजगी इसमाच्या नावावर हस्तांतरीत केल्याने मुंबई विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई येथील श्री.एस.एस. सांगळे, तत्कालीन संचालक, श्री.ए.के. कानिटकर, तत्कालीन व्यवस्थापक तसेच श्री.सुशील रामनाथ सोनावणे, तत्कालीन चाळ अधीक्षक व इतर ६ व्यक्तींविरोधात वरळी पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक २४.०५.२०२३ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

तसेच, सदर प्रकरणी मुंबई विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई येथील अधिकारी / कर्मचाऱ्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

श्री.एस.एस. सांगळे, तत्कालीन संचालक व श्री. सुशील रामनाथ सोनावणे, तत्कालीन चाळ अधीक्षक यांची पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एका वर्षासाठी रोखण्यात आली आहे.

श्री.ए.के.कानिटकर, तत्कालीन व्यवस्थापक (सेवानिवृत्त) यांचे निवृत्तीवेतन पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी ६% दराने रोखण्यात आली आहे. तसेच, श्री.कानिटकर हे सेवानिवृत्त असल्यामुळे विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ मधील नियम १२.३(४) नुसार त्यांचे शिक्षादेश निर्गमित करण्यापूर्वी त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सहमती आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीनुसार आयोगास पत्र पाठविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट झालेल्या भागातील अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिल्याबाबत

**(२३) * ६६२८० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या खडकवासला, कीरकीटवाडी, धायरी, नांदेड, नऱ्हेसह इतर भागात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील अनधिकृत बांधकामांना नोटीसा पाठविण्यात आल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकामांबाबत नोटीसा पाठवून संबंधित बांधकाम मालकांशी संगनमत करून आर्थिक तडजोड करत अशा बांधकामांना संरक्षण दिले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या अनधिकृत बांधकामामुळे शासनाच्या महसूलाचे देखील नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्रशासनाकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार देखील करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेसंदर्भात तसेच संबंधित बांधकाम मालक व दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकामाबाबत दिनांक १०.०५.२०२३ रोजी तक्रार प्राधिकरणाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली असता सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या अनधिकृत बांधकामधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निष्कासनाची कारवाई वेळोवेळी करण्यात येते. आतापर्यंत ३१६ प्रकरणी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे व १५ प्रकरणी निष्कासनाची कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच ६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व २८ प्रकरणामध्ये गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. तक्रारीमध्ये तथ्य आढळून न आल्याने अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाईचा प्रश्न उद्धवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई मेट्रो मार्गिका-२ ब मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या यादीत बेकायदेशिररित्या नावे समाविष्ट केल्याबाबत

**(२४) * ६५४५० डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो मार्गिका-२ ब मध्ये सर्वेक्षण व नकाशा तयार झाल्यानंतरही खोट्या दस्तऐवजाच्या आधारे काही अपात्र लोकांना पात्र ठरवून प्रकल्पग्रस्त यादीमध्ये नावे समाविष्ट करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये अंशत: बाधित, पूर्ण बाधित व एकाच परिवारातील अनेक सदस्यांना लाभ देणे, आयडी क्रमांकाविना लोकांना पात्र करून वाढीव परिशिष्ट तयार करणे, अशा प्रकारे शासनाची फसवणूक करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामध्ये संबंधित उपजिल्हाधिकारी, अतिक्रमण/निष्कासन चेंबूर, वांद्रे व त्यांचे कार्यालयातील तहसिलदार, समाजविकास अधिकारी व कक्ष अधिकारी यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

मेट्रो मार्गिका-२ब डी.एन नगर ते मंडाले प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बांधकामांचे सर्वेक्षण मे.इक्युएमएस या संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार सर्वेक्षण यादी व नकाशे तयार करुन भूसंपादन व पुनर्वसनाचे काम करण्यात आले. मेट्रो मार्गिका २ब प्रकल्प बाधितांच्या सर्वेक्षणासंदर्भात श्री.देवप्रकाश यादव याची दिनांक ०८.०५.२०२३ रोजी अपर जिल्हाधिकारी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तक्रार प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता अर्जदारास प्राधिकरणामार्फत दिनांक १२.०५.२०२३ रोजी सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. तसेच त्यांना दुरध्वनीद्वारे संपर्क साधून उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली होती. तथापि, ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

तक्रारदाराने केलेल्या अर्जातील तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर तक्रारीच्या पडताळणी करण्यात आली.

**१) श्री.फैयाज खान यांच्या ऐवजी श्री अबु बकर सिध्दीकी यांचे नाव मेट्रो मार्गिका २ब सर्वेक्षण नकाशा तयार केल्यानंतर पायाभूत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण यादी (BSES) तयार केल्यानंतर नावाचा समाविष्ट केल्याबाबत अशी तक्रार होती.**

सातांक्रुझ चेंबुर लिंक रोडमुळे बाधित झालेल्या प्रकल्प बांधिताच्या सर्वेक्षण यादीमध्ये श्री.फैयाज खान यांचे आयडी क्र २१८ए अशी नोंद होती. श्री.फैयाज खान मृत्यु पूर्वी आपल्या घराचे Power of attorney श्री.अबु बकर यांच्या नावे केली होती. श्री. अबु बकर सिध्दीकी यांच्या नावे श्री.फैयाज खान यांनी Power of attorney केली असल्याने श्री.अबु बकर यांचे नाव मेट्रो लाईन २ब च्या सर्वेक्षण यादीमध्ये ८९ वर घेण्यात आले. काही भागात सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड व मेट्रो लाईन-२ब या प्रकल्पांचा मार्ग overlap होत आहे. सांताक्रुझ चेंबुर लिंक रोड सर्वेक्षण यादीमधील २१८ए व मेट्रो लाईन २ब सर्वेक्षण यादी मधील ८९ आयडी क्रमांक हा एकच आहे. सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड बाधितामधील २१८ए या आयडी क्रमांकावरील लाभ घेतला असल्यामुळे मेट्रो २ब च्या प्रकल्पाग्रस्ताच्या यादीतील ८९ आयडी क्रमांकावर पुनर्वसनाचा लाभ देण्यात आलेला नाही.

**२) मेट्रो लाईन २ब प्रकल्पांतर्गत ७ प्रकल्प बाधितांना दुबार लाभ दिल्याबाबत**

तक्रार अर्जात नमूद श्रीमती रेहना अमीनुद्दिन, श्री.मन्सुर मोहम्मद इद्रिस शेख, श्री.जावेद इकबाल नोमान रंगवाला, श्री.सिराज अहमद, श्रीमती शिला धमनजानी, श्री.असरफ खान, श्री.फैयाज खान हे प्रकल्पबाधित सातांक्रुझ चेंबुर लिंक रोड व मेट्रो लाईन २ब या दोन्ही प्रकल्पामुळे बाधित झालेले होते. तथापि, सदर प्रकल्पबाधितांना साताक्रुझ चेंबुर लिंक रोड प्रकल्पग्रस्तांतर्गत पुनर्वसन करण्यात आले असल्यामुळे त्यांना मेट्रा लाईन २ब अंतर्गत पुनर्वसनाचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यामुळे दुबार लाभ देण्यात आले असे सिध्द झाले नाही.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध अभीलेख तपासला असता मेट्रो लाईन २ब सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड या दोन्ही प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना दुबार लाभ दिल्याचे तसेच जे लाभार्थी सांताक्रुझ चेंबूर लिंक रोडच्या प्रकल्पग्रस्त यादीप्रमाणे लाभ मिळालेला आहे. अश्या लाभार्थ्यांना मेट्रो लाईन २ब चा लाभ शासन धोरणानुसार देण्यात आलेला नाही.

एमयुटीपी धोरणानुसार पात्र / अपात्रतेबाबत अपील व तक्रार करण्याची मुभा आहे. प्राप्त तक्रारी व अपीले निकाली काढण्याकरीता उपजिल्हाधिकारी तथा प्रमुख क्षेत्रीय तक्रार निवारण समिती व अपर जिल्हाधिकारी तथा उच्च स्तरीय तक्रार निवारण समिती अशी व्दिस्तरीय तक्रार समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समित्यासमोर दाखल होणाऱ्या तक्रार/अपीलांवर सुनावणी घेऊन कागदपत्राची पडताळणी करुन पात्र/ अपात्रतेबाबत निर्णय घेण्यात येतो.

मेट्रो लाईन २ब अंतर्गत ३४१८ बांधकामाचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी ८९३ बांधकामे बाधित आहेत. यापैकी ३९४ बांधकाम धारकांना एमयुटीपी धोरणानुसार पात्र ठरत असलेल्या ३९४ निवासी / अनिवासी प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये झालेली अनियमितता

**(२५) * ६८५१४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करताना महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग व ठेकेदारांशी संगनमत करून गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संचालनालयामार्फत चौकशीअंती ९ जणांवर गुन्हा दाखल करुनही अद्यापपर्यंत संबंधितांवर कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची राज्य गुप्तचर विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
अशा प्रकारचे पत्र / निवेदन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.
(४) सदर प्रकरणी समरथ मल्टीबीज इंडिया प्रा.लि., इंडोग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस व जग्वार ग्लोबल सर्विसेस या तिन्ही ठेकेदारांनी एकाच आय.पी. (I.P. Address) वरुन निविदा दाखल केल्याचे आढळून आहे आहे. त्यामुळे निविदेतील अट क्र.१७.१७ मधील Restrictive Practices चा अवलंब केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्यामुळे, तिन्ही ठेकेदारांना संयुक्तिक भागीदारी संस्थेच्या सर्व भागीदारांवर पोलीस स्टेशन सिटी चौक येथे गु.र. नं. ७९/२०२३ अन्वये गुन्हा दाख़ल करण्यात आला आहे. मे.समरथ कन्स्ट्रक्शन जेव्ही या संस्थेचा काळया यादीत समावेश करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणाशी संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात आला असून, त्यानुषंगाने महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग “बी” येथील इकोनॉमिक हाईट्स या इमारतीचे बांधकाम शासकीय परवानग्या न घेता केल्याबाबत

**(२६)** * **७००४० श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग “बी” येथील हबीब हायस्कूल समोरील इकोनॉमिक हाईट्स नावाच्या १५ मजली इमारतीचे बांधकाम शासकीय नियमांचे उल्लंघन करून तसेच बांधकामास आवश्यक असणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या परवानग्या न घेता होत असून ते सध्या पुर्णत्वास आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध बांधकाम करीत असताना अग्निशमन विभागाची परवानगी घेण्यात आली नसून इमारतीच्या परिसरात आवश्यक असणारे अंतर न ठेवल्याने दुर्घटना घडल्यास शेकडो लोकांची जीवितहानी होवू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी लाईफ इन लाईट या एन.जी.ओ. ने सदर अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेच्या वारंवार निदर्शनास आणून देखील कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी विकासक आणि संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु होते हे खरे आहे. तथापि सदर बांधकाम सद्य:स्थितीत बंद आहे.

(२) सदर इमारतीच्या बांधकामाच्या वेळी मुंबई अग्निशमन दलाकडून परवानगी घेण्यात आलेली नाही.

(३) व (४) सदर इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील अनधिकृत आर.सी.सी. कॉलमच्या बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ (अ) अन्वये दिनांक २२.०७.२०१९ रोजी नोटीस बजावण्यात आल्यानंतर सदर काम बंद अवस्थेत होते. तथापि कोविड-१९ आजाराच्या काळाचा फायदा घेऊन नोटीसधारकाने सदर अनधिकृत बांधकाम पुन:श्च सुरु केले. तद्नंतर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर इमारतीची स्थळपाहणी केली असता सदर इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील कॉलम व स्लॅबच्या शटरिंगचे काम सुरु असल्याचे आढळले. त्यानुसार दिनांक १८.०८.२०२१ रोजी सदर इमारतीच्या मालक / ताबेदार यांच्याविरुध्द डोंगरी पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२(४३) अंतर्गत प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) नोंदविण्यात आला आहे व दिनांक २१.०९.२०२१ ते दिनांक १३.१२.२०२१ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर इमारतीत १८ वेळा निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

तदनंतर नोटीसधारकाने मा.नगर दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या खटला क्रमांक २५६४/२०२१ मध्ये मा.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अनुसरुन अंतरिम आदेश पारित करण्यात आले. दरम्यान सदर अनधिकृत बांधकाम मोठ्या स्वरुपाचे असल्याने सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी महापालिका अधिकृत निष्कासन ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली आहे.

तदनंतर पक्षकाराने दिनांक २८.०२.२०२२ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे ए.ओ. क्रमांक १६४/२०२२ अन्वये दाखल केलेल्या खटल्यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०८.०६.२०२२ पर्यंत स्थगिती आदेश दिले. सदर स्थगिती आदेश खारीज करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मा.उच्च न्यायालयात वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेकायदेशीर बांधकामासह शासनाचा कोट्यवधी रुपयांचा भूखंड अत्यल्प दरात विक्री केल्याबाबत

**(२७) * ६६२८६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेकायदेशीर बांधकामासह शासनाचा कोट्यवधी रुपयाचा भूखंड अत्यल्प दरात विक्री केल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पणन संचालक यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ग्रामिण यांना खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश देवूनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही .

कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारातील स. नं. ५५९/अ/२, ब/२ क्षेत्र १ हेक्टर ३४ आर या जमीनीचे बाजार समितीने शासनाचे माध्यमातून भूसंपादन केलेले आहे. दिनांक २५.०१.२०२३ रोजी वर्तमानपत्रात "पुणे बाजार समितीच्या प्रस्तावित अद्ययावत बाजार उभारणीसाठी ठेवलेला भुखंड आडत्यांच्या घशात", अशा शीर्षकाखाली बातम्या प्रसिध्द झालेल्या होत्या.

बाजार समितीच्या कामकाजाबाबतच्या प्राप्त तक्रारींबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांनी दिनांक २४.०२.२०२३ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी व विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० व नियम ११७ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांची नियुक्ती केलेली होती.

सदर चौकशी अहवालात "सर्व्हे नं. ५५९/अ/२, ब/२ या जागेमधील प्रस्तावीत डाळींब यार्डचे प्रत्येकी १२५० चौ. फुटाचे मोकळया जागेचे वाटप १८ आडत्यानां केलेले आहे. बाजार समितीने त्यांचेसोबत लिव्ह ॲण्ड लायसन्स करार केलेला आहे. लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर करुन पणन संचालक यांच्या मान्यतेसाठी बाजार समितीने प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण या कार्यालयास सादर केला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांचेकडील दिनांक १६.०३.२०२३ रोजीचा चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) मार्फत दिनांक २०.०३.२०२३ रोजी पणन संचालनालय, पुणे येथे प्राप्त झालेला होता. सदर अहवाल पुढील उचित कार्यवाहीसाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात आला आहे.

सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना दिनांक २५.०३.२०२३ चे आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केलेले आहे. तथापी सदर निलंबन आदेशाविरुध्द त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे दावा क्रमांक ३६२/२०२३ दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मा.न्यायाधिकरण यांनी दिनांक २७.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनाकडील दिनांक २३.०३.२०२३ रोजीचे तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांच्या निलंबनाचे आदेश रद्दबातल केले आहेत व अपिलकर्ता यांना आदेशाच्या तारखेपासून दोन आठवडयाच्या आत शासन सेवेत पदस्थापना देणेबाबत आदेशित केलेले आहे. शासन परिपत्रक दिनांक २४/०५/२०२३ रोजीच्या आदेशानुसार तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना उपसंचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे पदस्थापना दिलेली आहे.

उपरोक्त नमूद पुणे बाजार समितीच्या अनियमित कामकाजाबाबत जि.वि.ले.प वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करणेसाठी दिनांक १०.०५.२०२३ रोजीच्या पत्राने प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.